ePaper

| वर्ष - 7 | अंक - 148 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 5 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## "...म्हणून सुप्रिया सुळे बारामतीतून निवडून येतात": अमोल मिटकरी



### आतील पानांत


- एशियाडच्या भारताला तीन सुवर्ण!
- सायकलने शाळेत जायची परिणिती
- मोदी देशातील सर्वात भ्रष्ट पंतप्रधान!
- राज्यातील निवडणुका लांबणीवर!


# पुण्याचे 'पालक' अजित पवारच!

## »कार्यकर्त्यांचा जल्लोष : महायुती सरकारच्या निर्णयाचे स्वागत



।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुन्हा एकदा पुण्याचे पालकमंत्रीपद आले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडसह पुणे शहर आणि पुणे जिल्ह्याचा विकास वेगाने होण्यास मदत होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला.**

अजित पवार यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती होताच अजितदादांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातील अजित पवार समर्थक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. ठिकठिकाणी पेढे वाटण्यात आले तसेच फटाके फोडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. याबाबत अजित गव्हाणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहर हे देशातील सर्वांत वेगाने विकसीत होणारे शहर म्हणून नावारुपाला आले होते. अजितदादा उपमुख्यमंत्री होताच त्यांनी शहरात लक्ष घालण्यास सुरूवात केली असून गेल्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले आहेत.

यावेळी माजी विरोधी विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, फजल शेख, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, विशाल काळभोर, प्रदेश ओबीसी सेलचे उपाध्यक्ष सचिन औटे आदी उपस्थित होते.

### विकासाला गती मिळेल...



» आता पालकमंत्रीपद अजितदादांकडे आल्याने रखडलेल्या कामांना गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्याचा बारीक अभ्यास असल्याने तसेच पुढील ५० वर्षांच्या विकासाच्या नियोजनाची दृष्टी दादांकडे असल्यामुळे शहर व जिल्ह्याच्या विकासात भर पडेल, असा विश्वासही अजित गव्हाणे यांनी केला आहे. फटाके फोडून, पेढे वाटून आनंदोत्सव उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती होताच पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

# पिंपरी-चिंचवडमधून १० हजार मराठ्यांची 'फौज'!

## »मराठा आरक्षण : मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी १४ ऑक्टोबर रोजी अंतरवली सराटी येथे लाखो मराठा बांधव एकत्र येणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा सुरू आहे. या महासभेला पिंपरी चिंचवड शहरातून सुमारे दहा हजार मराठा बांधव घेऊन जाणार असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी दिली. त्यासाठी वाहतुकीची व्यवस्था देखील करण्यात आल्याचे काळे यांनी सांगितले.**




मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मोठा स्वाभिमानी लढा उभारला आहे. राज्य सरकारमधील सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी यांनी त्यांची भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा केली. त्यांनी नुकतेच सुरू केलेल्या दौऱ्याला लाखोंचा पाठिंबा मिळत आहे. राज्यातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी १४ ऑक्टोबर रोजी अंतरवली सराटी येथे लाखो मराठा बांधव एकत्र येणार आहेत. या दिवशी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाला एक महिना पुर्ण होत आहे.

आणखी दहा दिवसाची मुदत शिल्लक राहणार आहे. त्या दहा दिवसात दिवसात सरकारने आपल्या कामाची गती वाढवावी यासाठी हे भगवे वादळ शांततेच्या मार्गाने धडकणार आहे. या मध्ये मराठा समाज बांधवांच्या नेमक्या भावना काय आहेत, यावर उहापोह होणार आहे.

### मनोज जरांगे पाटलांना पाठिंबा...

» मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात बेमुदत उपोषण केले होते. तसेच एक दिवस पिंपरी-चिंचवड शहर बंद ठेवण्यात आले होते. त्याला सर्व संघटना मिळून मोठा पाठिंबा मिळाला. मराठा समाजाला आरक्षण मिळावे याबाबत शहरवासियांची देखील मोठी भावना आहे. त्याचा भाग म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटे येथे भव्य महामेळाव्याचे आयोजन केले आहे. या स्वाभिमानी महामेळाव्याला शहरवासीय देखील पाठिंबा देऊन सहभागी होणार आहेत. त्यासाठी शहरातून तब्बल दहा हजार समाज बांधव घेऊन जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ज्यांना सहभागी व्हायचे आहे. त्यांनी या 9881030007 नंबरवर संपर्क करा, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

# रिंगरोडचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांनी मांडला!

## पुणे: अजित पवारांनी दोन दिवसात करून दाखवलं, 636 कोटी प्रशासनाकडे जमा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्याच्या रिंगरोडसाठी आवश्यक असलेल्या जमिनीला संमती न मिळाल्याने जागेचे आता सक्तीने संपादन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, मावळ,मुळशी, भोर आणि हवेली तालुक्यातील १५ गावांच्या भूसंपादनासाठी दुसऱ्या टप्प्यातील ६३६ कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला आहे. या निधीचे येत्या दहा दिवसांत संबंधित तालुक्याच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना वितरीत करण्यात येणार आहे. हा निधी मिळाल्याने रिंग रोडच्या भूसंपादनासाठी गती मिळणार आहे.**



पुणे आणि पिंपरी चिंचवड भोवतीचा १७२ किलोमीटर लांबीचा आणि ११० मीटर रुंदीचा रस्ते विकास महामंडळाने रिंग रोड तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. त्या करिता जिल्हा प्रशासनाकडून पूर्व आणि पश्चिम भागातील गावांमधून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पश्चिम भागातील काही गावांमधून संपादनासाठी संमती देण्यात आली होती. पूर्व आणि पश्चिम रिंग रोडसाठी ७२१ हेक्टर क्षेत्र जमीन संपादित करायची आहे. त्यासाठी आतापर्यंत १०३५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी १०२१ कोटी रुपयांचा निधीचे भूसंपादनासाठी वाटप करण्यात आले आहे. त्या निधीतून आतापर्यंत २०५ हेक्टर अर्थात सुमारे ५२५ एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. निधी संपल्याने यापूर्वी जिल्हा प्रशासनाने रस्ते विकास महामंडळाला प्रस्ताव पाठविले होते. दरम्यान, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करताना निधीची मागणी केली होती. त्यानंतर दोनच दिवसांत जिल्हा प्रशासनाला हा निधी मिळाल्याने गती येणार आहे.

जिल्हाधिकारी डॉ. देशमुख म्हणाले, ‘जिल्हा दर समितीची बैठक घेऊन १५ गावांतील सक्तीच्या भूसंपादनाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात मावळमधील सहा, मुळशीतील तीन, हवेलीतील चार आणि भोर तालुक्यातील दोन गावांचा समावेश आहे. या संदर्भात आणखी सोळा गावांच्या सक्तीच्या भूसंपादनाच्या निवाड्यासाठीच्या परिगणन तक्त्याला सहा ऑक्टोबरला होणाऱ्या बैठकीत मान्यता देण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील ६३६ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून त्यामध्ये मावळसाठी दोनशे कोटी, हवेलीसाठी चारशे कोटी रुपये तसेच भोर तालुक्यासाठी ३६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.’

पूर्व भागातील रिंग रोडसाठी खेड तालुक्यातील १३ गावांपैकी ११ गावांच्या जमिनीचा मोबादला निश्चित करण्यात आला आहे. त्याला अंतिम मान्यता देण्यात आली असून त्या ठिकाणची २९२ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे. त्या करिता शेतकऱ्यांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

> “ पुण्याच्या रिंग रोडसाठी सक्तीच्या भूसंपादनासाठी अतिरिक्त ६३६ कोटी रुपयांचा निधी रस्ते विकास महामंडळाने जिल्हा प्रशासनाला दिला आहे. मावळ, हवेली आणि भोर येथील उपविभागीय अधिकाऱ्यांना निधी येत्या दहा दिवसात वितरीत करण्यात येणार आहे.
>
> **- डॉ. राजेश देशमुख,** जिल्हाधिकारी

# विकसित पिंपरी-चिंचवडला ‘स्मार्ट’ बनवण्याचा निर्धार!

## प्रलंबित अन् सुरु असलेली विकासकामे मार्गी लावा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सध्या विविध विकासाभिमूख कामे सुरु आहेत. या कामांमुळे शहराचा चेहरामोहरा बदलण्यास मोठा हातभार लागणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये भाजपाचे योगदान आहे. यामुळेच विकसित शहराला अजून ‘स्मार्ट’ बनविण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक कार्यवाही करावी, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केल्या.**



चिंचवड विधानसभा मतदार संघासह शहरातील कामांना गती यावी व तसेच नवीन प्रकल्प शहरात साकारले जावेत. यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या दालनामध्ये भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने बैठक घेण्यात आली. यावेळी माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी स्थायी समिती सभापती राजेंद्र राजापुरे, माजी नगरसेवक सागर आंघोळकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांची भेट घेताना विकासात्मक कामांवर चर्चा करण्यात आली. यावेळी पिंपळे गुरव येथील व्हिलेज प्लाझा हा प्रकल्प, प्रकल्प विभागाच्या वतीने राबविणे, पिंपळे निलख येथील रक्षक चौकात ग्रेड सेपरेटरच्या बरोबरीने भूयारी मार्गाची निर्मिती करणे, पिंपळे गुरव येथील कल्पतरू सोसायटीसमोर होणाऱ्या वाहतूककोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रकल्पांची चाचपणी करणे, वाल्हेकरवाडी डांगे चौकातील पशुसंवर्धन येथील जागेपासून डांगे चौकाला जोडणारा पूल तयार करणे, सांगवी फाटा येथे नागरिकांसाठी पादचारी पुलाची निर्मिती करणे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राची अद्ययावत इमारत चिंचवड येथील ‘एम्पायर इस्टेट’ येथे प्रस्तावित करणे, काळेवाडी कुणाल हॉटेल चौक -चिंचवड दरम्यान केशवनगर पुलापर्यंत ‘एलीव्हेटेड’ पुलाची निर्मिती करणे अशी नवी कामे ‘प्रकल्प विभागा’साठी प्रस्तावित करण्यात आली. वाकड येथील दत्त मंदिर रस्त्याचे सुरु असलेले काम त्वरीत पूर्ण करणे, पिंपळे गुरव ते दापोडी येथे असलेला अरुंद पूलने होत असलेली वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नवीन पुलाची निर्मिती करणे, पिंपळे गुरव - नवी सांगवी सीमेवरील कृष्णा चौक ते एम के हॉटेल विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे, ‘ब’,‘ड’, ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयातील डीपी व अंतर्गत रस्ते विकसित करणे या संदर्भात देखील निवेदन देण्यात आले आहे. कोणत्याही शहराचे रस्ते हे त्या शहराच्या रक्तवाहिन्या असतात. जोपर्यंत रस्ते विकसित होत नाहीत, तोपर्यंत शहराचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही. याच अनुशंगाने शहराच्या विकासाला चालना मिळावी आणि शहराचा भौगोलिक विकास व्हावा, याकरिता आयुक्तांची भेट घेऊन विविध प्रकल्पांची मागणी केली. तसेच, त्या-त्या प्रभागातील माजी नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून समतोल विकासाचे सूत्र राबवावे, अशा सूचनाही जगताप यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

> “ लोकनेते आमदार स्व. लक्ष्मण जगताप आणि भारतीय जनता पार्टीच्या पुढाकाराने शहरामध्ये विविध लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात आले. त्यामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत सिमेंटचे रस्ते, अर्बन स्ट्रीट, उड्डाणपूल, उद्याने, रुग्णालये, नदी सुधार प्रकल्प, बीआरटीएस असे महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे शहराला विकासाची नवीन उंची मिळाली. हाच विकासरथ पुढे घेऊन जाण्यासाठी शहरामध्ये नवीन प्रकल्पांची निर्मिती व प्रलंबित प्रकल्पांना चालना देण्यासाठी आज आयुक्तांची भेट घेतली. आयुक्तांनी देखील या बैठकीमध्ये दिलेल्या प्रस्तावांना सकारात्मक प्रतिसाद दिला.
>
> **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी- चिंचवड.

# आर्थिक अडचणीतील पंकजा मुंडे पिंपरी-चिंचवडमध्ये ‘एकाकी’!

## » मदतीसाठी उदासीनता : पद, प्रतिष्ठा मिळवणाऱ्यांचा सावध पवित्रा

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारतीय जनता पार्टीच्या नेत्या आणि राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याला वस्तू आणि सेवा कर आयुक्तालयाने १९ कोटी रुपयांची नोटीस बजावली असून, त्या आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे त्यांच्या मदतीसाठी राज्यभरातील समर्थक पुढे आले आहेत. आता एकेकाळी पिंपरी-चिंचवडमधील मुंडे गटाच्या ‘कट्टर समर्थक’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या विद्यमान आमदार उमा खापरे, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे आणि माजी उपमहापौर केशव घोळवे आदी नेत्यांच्या भूमिकेकडे मुंडे समर्थकांचे लक्ष लागले आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात भाजपा रुजवण्यात स्व. गोपिनाथ मुंडे यांचा मोठा वाटा आहे. त्याकाळी शहरात मुंडे समर्थक आणि गडकरी समर्थक असे दोन अप्रत्यक्ष गट होते. भाजपा विरोधी पक्षात असला आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ताकद कमी असली तरी, स्व. गोपिनाथ मुंडे यांनी सघटनात्मक पदाधिकाऱ्यांना मोठी ताकद दिली होती.

२०१४ मध्ये राज्याच्या सत्तेत भाजपा आली. त्यानंतर २०१७ मध्ये महापालिकेतील भाजपा सत्ताधारी पक्ष बनला. त्यामुळे मुंडे व गडकरी समर्थकांना महत्त्वाच्या पदांवर संधी देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने विधान परिषदेच्या विद्यमान आमदार उमा खापरे, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे आणि माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी स्वीकृत नगरसेवक मोरेश्वर शेडगे यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या सर्वच नेत्यांनी भाजपा निष्ठावंत म्हणून संधी मिळाल्यानंतर पंकजा मुंडे यांचे प्रत्यक्ष भेटून त्या-त्यावेळी कृतज्ञताही व्यक्त केली आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांना राज्याच्या राजकारणातून ‘साईडट्राईक’ केले जात असल्याची चर्चा होती. आता जीएसटी आयुक्तालयाने १९ कोटी रुपयांची नोटीस बजावली. त्या आर्थिक अडचणीत असल्याचे त्यांनी जाहीरपणे एका टीव्ही वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटले. त्यामुळे राज्यभरातील मुंडे समर्थकांनी धनादेश, रोख असा मदतीचा ओघ सुरू केला. परिणामी, पिंपरी-चिंचवड शहरातून मदतीसाठी पुढाकार घेतला जाईल, अशी अपेक्षा होती मात्र, तसे चित्र दिसत नाही.

याबाबत आमदार उमा खापरे यांच्याशी संपर्क केला असता, त्या म्हणाल्या की, ज्येष्ठ नेते सदाशिव खाडे यांच्याकडे संपर्क करा. ते याबाबत तुम्हाला माहिती देतील.

दुसरीकडे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांना संपर्क केला असता ते म्हणाले की, मी सध्या कामात आहे. शहरातील मुंडे समर्थक नेत्यांचा प्रतिसाद पाहता पंकजा मुंडे यांना अर्थिक मदतीसाठी कोणीही पुढे येईल, याबाबत साशंकता दिसत आहे. परिणामी, निष्ठावंत आणि समर्थक म्हणून विविध पदांचा लाभ मिळणाऱ्या स्थानिक मुंडे समर्थक नेत्यांनी आत्मचिंतन करावे, अशी खंत व्यक्त केली जात आहे.



### कामगार नेते केशव घोळवे यांच्या भूमिकेकडे लक्ष...

» कामगार क्षेत्रात विशेष प्रभाव असलेले पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी उपमहापौर केशव घोळवे यांची ओळख मुंडे समर्थक अशीच आहे. त्यांना उपमहापौर पदाची संधी देताना तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शिफारस लावून धरली होती. त्यामुळे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचे तत्कालीन समर्थक नगरसेवक वसंत बोराटे यांना नाराज करुन घोळवे यांना उपमहापौरपदावर वर्णी लावण्यात आली. पंकजा मुंडे यांनी त्यावेळी “किमान सहा महिने केशवला संधी द्या...” असा आग्रह धरला होता. लांडगे यांना डावलून केशव घोळवेंना उपमहापौरपदी संधी मिळाली. त्यामुळे नाराज झालेल्या वसंत बोराटे यांनी महेश लांडगे यांची साथ सोडली आणि राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. आता घोळवे मुंडे घराण्याच्या मदतीसाठी पुढाकार घेतील काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यासह राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे यांचाही पवित्रा निर्णायक ठरणार आहे. विशेष म्हणजे, मुंडे गटाकडून सर्वाधिक लाभार्थी असलेले सदाशिव खाडे यांनी सर्व मुंडे समर्थक नेत्यांची मोट बांधून पिंपरी-चिंचवडमधून आर्थिक मदत उभा केली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आमदार उमा खापरे पुढाकार घेतील काय?

» मुंडे समर्थकांनी आर्थिक मदतीसाठी ‘गोपिनाथ मुंडे प्रतिष्ठान’ च्या नावाने वर्गणी जमा करण्यास सुरूवात केली आहे. सोशल मीडियावर तसे धनादेश व्हायरल होत आहेत. त्यामुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून सुरू असलेला मदतीचा ओघ मुंडे कुटुंबियांप्रती असलेली सहवेदना अधोरेखित करणारी आहे. असे चित्र राज्यभरात असताना पिंपरी-चिंचवडमधील मुंडे समर्थक म्हणून ओळख असलेला एकही नेता मदतीसाठी पुढे आलेला दिसत नाही. विधान परिषदेच्या विद्यमान आमदार उमा खापरे यांनी याबाबत पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा सामान्य मुंडे समर्थकांमधून व्यक्त होत आहे. कारण, उमा खापरे यांना मुंडे यांच्या मदतीमुळे दोनवेळा नगरसेवकपदाचे तिकीट, महापालिकेतील विरोधी पक्षनेतेपद, संघटनेमध्ये शहराध्यक्षासह विविध महत्त्वाची पदे मिळालेली आहेत. उमा खापरे यांना राजकीय ‘प्लॅटफॉर्म’ देण्यात स्व. गोपिनाथ मुंडे यांचा वाटा मोठा आहे. सध्या विधान परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यातही पंकजा मुंडे यांनी निर्णायक भूमिका घेतल्याचे सांगितले जाते. त्यामुळे उमा खापरे मदतीसाठी पुढाकार घेवून राजकीय परतफेड करणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



**“ मला मुंडे कुटुंबियांप्रति आदर आहे. पंकजा मुंडे भाजपाच्या नेत्या आहेत. त्यामुळे मी वैयक्तिक आत्मियतेमुळे त्यांना आर्थिक मदत करणार आहे. दोन दिवसांत मी प्रत्यक्ष त्यांना भेटणार आहे. त्यावेळी माझ्या क्षमतेप्रमाणे मी मदत करेन. स्व. गोपिनाथ मुंडे यांना मानणाऱ्या प्रत्येकाची हिच भावना आहे.**

– मोरेश्वर शेडगे, माजी स्वीकृत नगरसेवक.

# खुशी मुल्ला महिला क्रिकेट संघाची कर्णधार

## » पिंपरी-चिंचवडची कन्या : महापालिकेतर्फे सन्मान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**काळेवाडी येथील खुशी मुल्ला या महिला खेळाडूची १९ वर्षांखालील महाराष्ट्र महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असल्याने औद्योगिक तसेच क्रिडानगरी असलेल्या पिंपरी चिंचवड शहरासाठी ही अतिशय अभिमानास्पद बाब असून त्यामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले, तसेच खुशी मुल्ला या क्रिकेटच्या इतिहासात दैदिप्यमान अशी कामगिरी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**



खुशी मुल्ला या महिला क्रिकेट खेळाडूची महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झाली. या निमित्ताने खुशी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भेट दिली. त्यादरम्यान त्यांचा अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सत्काराच्या वेळी क्रिडा अधिकारी अनिता केदारी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक शादाब शेख तसेच खुशी मुल्ला यांचे वडील नवीलाल मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते संजय गायके आदी उपस्थित होते.

### दिलीप वेंगसरकर यांचे मार्गदर्शन...

» खुशी मुल्ला यांनी थेरगाव येथील व्हेरॉक वेंगसरकर अकादमी येथे १० वर्षांपुर्वी प्रवेश घेऊन क्रिकेट खेळण्यास सुरूवात केली. त्यांनी १६ वर्षाखालील, १९ वर्षाखालील, २३ वर्षाखालील गटात महाराष्ट्र क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व केले, त्यांना भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शनही लाभले आहे.




**अत्यंत गंभीर मुद्द्यांवर पक्षातीत विचारविनिमय होऊन मतैक्य घडून यावे आणि आर्थिक पेच टळावा, यासाठी प्रयत्न केल्याबद्दल एखाद्या मोठ्या लोकशाही देशातील सभागृह नेत्याचीच हकालपट्टी होते, तेव्हा ते सभागृहच नव्हे तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच विकारग्रस्त झाली आहे असे खुशाल समजावे. अशा प्रकारे एखाद्या पीठासीन अधिकाऱ्याची हकालपट्टी जेव्हा अमेरिकेसारख्या देशामध्ये होते.**

# गच्छंती मॅकार्थींची, फजिती अमेरिकेची!



तेव्हा त्याचे परिणाम अमेरिकेपलीकडेही जाणवणारे असतात. अमेरिकी काँग्रेसमधील प्रतिनिधिगृहाचे सभापती केव्हिन मॅकार्थी यांना त्यांच्याच पक्षाच्या काही प्रतिनिधींनी पुढाकार घेऊन पदच्युत केले. मॅकार्थी हे रिपब्लिकन पक्षातले आदर्श नामदार नव्हेत. पण अमेरिकी प्रशासनासाठी नियत कर्जमर्यादा वाढवण्याचा मुद्दा असो वा अगदी अलीकडचा सरकारी कामकाज खर्चमंजुरीअभावी ठप्प पडण्याची संभाव्यता असो, मॅकार्थी यांना प्रतिनिधिगृहातील डेमोक्रॅट्स सदस्यांची मदत घ्यावी लागली आणि अनेकदा त्यासाठी अमेरिकेचे डेमोक्रॅटिक अध्यक्ष जो बायडेन यांच्याशी मसलतही करावी लागली. याचेच भांडवल रिपब्लिकन पक्षातील अतिउजव्या विचारसरणीचे प्रतिनिधी मॅट गेट्झ यांनी केले. वास्तविक दोन्ही पेचप्रसंगांमध्ये मॅकार्थी यांनी पक्षनिष्ठेऐवजी व्यावहारिक शहाणपणाला प्राधान्य दिले. शिवाय परवा त्यांनी खर्चमंजुरीविषयी तडजोड घडवून आणली, ती तात्पुरत्या स्वरूपाचीच आहे. म्हणजे नोव्हेंबर मध्यापर्यंत खर्चास मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा सभागृहात खर्चाबाबत नव्या तरतुदींना मंजुरी द्यावी लागेल. पण गंमत अशी, यासाठी डेमोक्रॅट्स सदस्यांबरोबर वाटाघाटी करेल अशी व्यक्ती- म्हणजे सभापती- कोण, हे अद्याप निश्चित झालेले नाही. म्हणजे गेट्झ यांच्यासह रिपब्लिकन पक्षाच्या ज्या आठ सदस्यांनी मॅकार्थी यांच्या गच्छंतीसाठी रान उठवले आणि अखेरीस आपले उद्दिष्ट साध्य केले त्यांच्याकडे मॅकार्थींना पर्यायी नाव उपलब्ध नाही. अमेरिकेच्या कलुषित आणि दुभंगलेल्या राजकीय हवेचे ताजी घटना ठसठशीत निदर्शक आहे.जे काही घडले, ते अभूतपूर्व आहे. अमेरिकेच्या इतिहासात आजवर कधीही प्रतिनिधिगृहाच्या सभापतीविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल होऊन तो मंजूर झालेला नाही. पण गेल्या काही वर्षांमध्ये विशेषत: रिपब्लिकन नेत्यांच्या बाबतीत 'अभूतपूर्व' वगैरे काही शिल्लक राहिलेले नाही. कारण पक्षस्वार्थापलीकडे देशहित किंवा लोकशाहीच्या हिताकडे पाहण्याची अमेरिकेतील संस्कृती या मंडळींनी कधीच मोडून टाकली आहे. या नव्या विचारसरणीचे निर्माते आणि आश्रयदाते आहेत अर्थातच डोनाल्ड ट्रम्प. ट्रम्प यांच्यानुसार टोकाचे राजकारण केले, तर आणि तरच आपल्याला काही भवितव्य आहे, असे वाटणाऱ्यांची संख्या रिपब्लिकन पक्षात वाढू लागली आहे. किंबहुना ट्रम्प हेच आता अध्यक्षीय निवडणूक जिंकण्यास सक्षम उमेदवार पक्षात उरलेले आहेत, हा प्रचार बहुतांना खरा वाटू लागला आहे. अमेरिकेची उदात्त आणि समावेशक लोकशाही व्यवस्था, स्थलांतरितांचे त्या देशाच्या उत्थानातील योगदान, जगातील सर्वात सक्षम अर्थव्यवस्था आणि सर्वशक्तिमान लष्करी सत्ता असल्याबद्दल येणाऱ्या जबाबदाऱ्या यांविषयी काडीचाही रस नसलेल्या आणि निव्वळ उद्दाम सत्ताकारणातच गती आणि मती असलेल्या काही टवाळांनी मॅकार्थी यांना त्यांनी केलेल्या तडजोडींबद्दल नको जीव करून सोडले होते. एका अर्थी मॅकार्थी हे स्वत:च या चक्रव्यूहात अडकत गेले. सर्वसंमती या मूल्याशी पूर्णत: प्रतारणा घेतलेल्या नि 'हाऊस फ्रीडम कॉकस' नामे गट म्हणून वावरणाऱ्या गेट्झ यांच्यासारख्या रिपब्लिकन सदस्यांमुळे मॅकार्थी यांची सभापतीपदी निवडही जिकिरीची ठरली होती. रिपब्लिकन बहुमत असलेल्या सभागृहात, रिपब्लिकनच सभापती निवडण्यासाठी १५ फेऱ्या घेतल्या गेल्या. अखेर मॅकार्थी यांच्या नावावर काही तडजोडींनंतर शिक्कामोर्तब झाले. यांतील एक तडजोड म्हणजे, कोणत्याही सदस्याला कोणत्याही मुद्द्यावर मॅकार्थी यांच्या हकालपट्टीसाठी मतदानाची मागणी करण्याची मुभा! अखेर ही तरतूदच मॅकार्थी यांच्या पतनास कारणीभूत ठरली. यांतून काही रिपब्लिकन सदस्यांचे समाधान झाले, पण देश अडचणीत येण्याची शक्यता आहे. खर्चमंजुरीची मुदत नोव्हेंबरच्या मध्यावर संपुष्टात येईल. त्यापूर्वी नवीन सभापती नियुक्त व्हावा लागेल. परंतु अमेरिकेमध्ये तिसऱ्या सर्वात प्रभावी प्रशासकीय पदावरील- अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेनेट सभापती यांच्यानंतर- व्यक्तीची ज्या प्रकारे हकालपट्टी पाहता रिपब्लिकन पक्षातीलच फार कोणी या पदावर काम करू धजणार नाही.

## संपादकीय »

### 'जननी'चे लज्जारक्षण!

***कथासूत्रावरील नियंत्रण सुटले की पूर्वीचे राजे-महाराजे कथाकथनकारांस दमांत घेत. हेतू हा की त्याने आपणास अप्रिय कथाकथन करू नये.***

कथासूत्रावरील नियंत्रण सुटले की पूर्वीचे राजे-महाराजे कथाकथनकारांस दमांत घेत. हेतू हा की त्याने आपणास अप्रिय कथाकथन करू नये. आधुनिक काळात राजे-महाराजे नाहीत असे म्हणतात. पण तरी सत्ताधीशांची अप्रिय कथा रोखण्याची आणि त्यामुळे त्यासाठी कथाकारांवर नियंत्रण ठेवण्याची वृत्ती कायम आहे. या वृत्तमाध्यमांतील पत्रकारांस पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यासाठी रामप्रहरी विविध ठिकाणी पोलिसांनी निमलष्करी दलाच्या सशस्त्र दलांसह कडेकोट बंदोबस्तांत धाडी घातल्या आणि भल्या सकाळी या माध्यमकारांचे मोबाइल फोन, लॅपटॉप्स आदी दळणवळण सामग्री जप्त केली. त्यानंतर त्यांची घरी, कार्यालयात, पोलीस मुख्यालयात आदी ठिकाणी नेऊन चौकशी केली गेली. दिल्ली दंगलीचे वार्तांकन केले का, परदेशांत कोणाशी संपर्कात आहात, सीएए/एनआरसी आंदोलनात सहभागी होतात.

**घरवापसी, हिंदूराष्ट्र या मृगजळी कल्पनांचा पाठपुरावा करताना सदोदित अडसर ठरत आली आहे ती चातुर्वण्र्य आणि जातव्यवस्था. त्यामुळे सामाजिक विषमतेचा मुद्दा अधोरेखित होतो तेव्हा त्याचे रूपांतर धार्मिक द्वेषामध्ये करण्याचा प्रयत्न होतो. मंडल विरुद्ध कमंडल हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आता या दोन्ही चळवळींचा लेखाजोखा खरे तर ओबीसींनी मांडायला हवा.**

# जातीय संघर्षांबरोबरच पक्षफुटीलाही निमंत्रण!

धार्मिक द्वेषाचे चलन गायपट्टा सोडून इतरत्र प्रभावीपणे काम करेनासे झाले आहे हे संबंधितांच्या ध्यानात आले आहे. त्यामुळे रोहिणी आयोगाद्वारे इतर मागास प्रवर्गातील आरक्षणाचे वर्गीकरण हा जाती-जमातींच्या नव्या विध्वंसक सोशल इंजिनीअरिंगचा प्रयोग सुरू आहे. मात्र यामुळे इतर मागास प्रवर्गातील जातींमधील संघर्षांला निमंत्रण मिळणार आहे. महाराष्ट्रात या प्रवर्गातील जातींची संख्या ३४६ आहे. (संदर्भ: महाराष्ट्र शासन निर्णयात प्रसिद्ध झालेल्या आरक्षित इतर मागासवर्ग जाती) तर देशामध्ये या प्रवर्गातील जातींची संख्या २,६३३ आहे. यावरून या संघर्षांच्या व्याप्तीचा अदमास येऊ शकतो. विशेषत: इतर मागासवर्गातील राजकीय आरक्षणाबाबत हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. कारण या प्रवर्गातील ज्या जातींनी आरक्षणाचे लाभ उठवले असल्याचा आरोप केला जातोय, त्या सर्व जाती राजकीय, आर्थिक, संख्यात्मकदृष्ट्या



प्रबळ आणि प्रभावी आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, जातवार जनगणनेला शह म्हणून भाजपने इतर मागास प्रवर्गातील आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचा चालवलेला प्रयत्न त्यांच्याच अंगलट येण्याची शक्यता आहे असे पूर्वानुभव सांगतो. विद्यमान संरक्षणमंत्री आणि उतर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री राजनाथ सिंह यांनी २००१-२००२ मध्ये अशा वर्गीकरणाचा प्रयत्न केला होता. त्यांनी इतर मागासवर्गाच्या आरक्षण कोटय़ाचे वाटप केले होते. त्यामुळे इतर मागास प्रवर्ग जातींमध्ये संघर्ष निर्माण झाला. त्यापेक्षाही (भाजप) पक्षामध्ये प्रचंड असंतोष उफाळून आला. अनेक ओबीसी सदस्य, मंत्री यांनी पक्षनेतृत्वाला या प्रकरणी विरोध केला होता. काही पदाधिकाऱ्यांनी बंडखोरीचा इशारा दिला होता. राजनाथ सिंह मंत्रिमंडळातील तत्कालीन पाटबंधारेमंत्री आणि उच्चशिक्षणमंत्री ओमप्रकाश सिंह, सहकारमंत्री रामकुमार वर्मा, पर्यटनमंत्री अशोक यादव, पक्षाचे उपाध्यक्ष आणि खासदार विनय कटियार आदींचा यामध्ये समावेश होता. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनीही या निर्णयामुळे पक्षाचे नुकसान अधिक होईल असे सांगत या प्रकरणी आपण वैयक्तिकरीत्या समाधानी नसल्याचे स्पष्ट केले होते. (संदर्भ: फ्रंटलाइन, सप्टेंबर २००१)तिसरा मुद्दा म्हणजे इतर मागासवर्गाच्या आरक्षणाचे वर्गीकरण करणे किंवा नव्या समूहांचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करणे या धोरणात्मक बाबी कथित सामाजिक ऐक्याची वीण उसवणाऱ्या ठरणार आहेत. खरे तर मानव्य आणि समाजशास्त्रानुसार काळाच्या ओघात जमातींची संख्या घटत जाऊन जातींची संख्या वाढत जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यातील निवडणुका लांबणीवर!

## ओबीसी आरक्षणाबाबतची सुनावणी आता 28 नोव्हेंबरला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि ओबीसी आरक्षणाबाबतची सुनावणी आता 28 नोव्हेंबरला होणार आहे. त्यामुळे नोव्हेंबर अखेरपर्यंत राज्यातील निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. गेल्या दीड वर्षापासून या प्रकरणी केवळ पुढील दिनांक मिळत आहे.**

या प्रकरणी दीड वर्षात एकदाही सुनावणी झाली नाही. या प्रकरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीबाबत सांशकता कायम आहे. मुंबई, पुण्यासह अनेक महानगरपालिका जिल्हा परिषदा, इतर स्थानिक स्वराज्य संस्था या सगळ्या निवडणुकांचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयाच्या या सुनावणीवर अवलंबून आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील या सुनावणीकडे राजकीय मंडळी आणि महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. या प्रकरणासाठी न्यायालयाने सुनावणीसाठी यापूर्वी 20 सप्टेंबर तारीख निश्चित केली होती. मात्र, त्या दिवशी या प्रकरणात सुनावणी झाली नाही. त्यानंतर पुढची तारीख देण्यात आली होती. आता पुन्हा 28 नोव्हेंबरची तारीख देण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुनावणीमुळे लांबणीवर पडल्या आहेत. मात्र, नोव्हेंबरला दिवाळी आहे. त्यानंतर सुनावणी होईल. त्या वेळी न्यायालयाने निवडणुकांचा मार्ग मोकळा केला तरी, एका महिन्यात सर्व तयारी शक्य वाटत नाही. त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या 2024 मध्येच शक्य असल्याचे बोलले जात आहे. पुढील वर्षी देशातील सार्वत्रिक निवडणुका देखील आहेत. त्यामुळे या सर्व निवडणुका एकत्र होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर अशा अनेक महत्त्वाच्या शहरांच्या मनपा निवडणुका तसेच नगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे भवितव्य या निकालावर अवलंबून आहे. यामध्ये 25 महापालिका, 207 नगरपालिका, जिल्हा परिषद यांचा समावेश आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय न्यायपीठासमोर क्रमांक आठवर हे प्रकरण सुनावणीसाठी होते. पण आजही यावर सुनावणी झालेली नाही.



### पालिका प्रशासनासमोर पेच

» शिमुंबई, पुण्यासह अनेक महानगरपालिका जिल्हा परिषदा, इतर स्थानिक स्वराज्य संस्था या सगळ्या निवडणुकांचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयाच्या या सुनावणीवर अवलंबून आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील या सुनावणीकडे राजकीय मंडळी आणि महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. या प्रकरणासाठी न्यायालयाने सुनावणीसाठी यापूर्वी 20 सप्टेंबर तारीख निश्चित केली होती. मात्र, त्या दिवशी या प्रकरणात सुनावणी झाली नाही. त्यानंतर पुढची तारीख देण्यात आली होती. आता पुन्हा 28 नोव्हेंबरची तारीख देण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुनावणीमुळे लांबणीवर पडल्या आहेत. मात्र, नोव्हेंबरला दिवाळी आहे. त्यानंतर सुनावणी होईल. त्या वेळी न्यायालयाने निवडणुकांचा मार्ग मोकळा केला तरी, एका महिन्यात सर्व तयारी शक्य वाटत नाही.

# उद्धव ठाकरे गटाचे पुन्हा वाढले टेन्शन!

## आमदार अपात्र प्रकरणी सुनावणी पुन्हा लांबणीवर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह 16 आमदार पात्र की अपात्र, याबाबत सर्वोच्च न्यायालयात येत्या 6 ऑक्टोबर रोजी सुनावणी पार पडणार होती. मात्र, आता पुन्हा एकदा ही सुनावणी लांबणीवर पडल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता पुन्हा ठाकरे गटाचं टेन्शन वाढले आहे. हे प्रकरण लिस्टेड न झाल्याने ही सुनावणी 9 ऑक्टोबर रोजी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला मात्र, दिलासा मिळाला आहे.**

शिवसेना आमदार अपात्रतेसंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. मात्र, ते ही सुनावणी करताना टाळाटाळ आणि वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. यासाठी उद्धव ठाकरे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात पुन्हा याचिका दाखल करण्यात आली आहे. गेल्या सुनावणीच्या वेळी देखील सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकर यांना फटकारत लवकर सुनावणी पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. या संदर्भात 6 ऑक्टोबर रोजी सुनावणी पार पडणार होती. मात्र, ही सुनावणी आता लांबणीवर पडली आहे. अपात्र आमदारांच्या सुनावणीबाबतीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करत ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. या संदर्भात ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी घेताना न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना चांगलेच फटकारले होते. विधानसभा अध्यक्षांनी दोन आठवड्यात आमदार अपात्र प्रकरणाच्या सुनावणीचा रोडमॅप सादर करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या होत्या. तसेच या प्रकरणावर येत्या 6 ऑक्टोबरला सुनावणी होणार होती. शिवसेना आमदार अपात्रतेसंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. मात्र, ते ही सुनावणी करताना टाळाटाळ आणि वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाने केला आहे. यासाठी उद्धव ठाकरे गटाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात पुन्हा याचिका दाखल करण्यात आली आहे. गेल्या सुनावणीच्या वेळी देखील सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकर यांना फटकारत लवकर सुनावणी पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. या संदर्भात 6 ऑक्टोबर रोजी सुनावणी पार पडणार होती. मात्र, ही सुनावणी आता लांबणीवर पडली आहे.



### राहुल नार्वेकर यांना फटकारले

» अपात्र आमदारांच्या सुनावणीबाबतीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करत ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. या संदर्भात ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी घेताना न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना चांगलेच फटकारले होते.

# मिंध्यांकडे एवढी तरी नीतिमत्ता उरली आहे काय?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

रुग्णकांडातील बळी म्हणजे सरकारने केलेले अप्रत्यक्ष खूनच आहेत व त्यासाठी या खुनी सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हायलाच हवा! अशी मागणी उद्धव ठाकरे गटाने राज्य सरकारकडे केली आहे. या सरकारमध्ये जराशीही माणुसकी व लोकभावनेची चाड उरली असेल तर राज्याच्या आरोग्यमंत्र्यांचा तडकाफडकी राजीनामा घेतला पाहिजे. असेही उद्धव ठाकरे गटाने म्हटले आहे. मिंध्यांकडे एवढी तरी नीतिमत्ता उरली आहे काय? असा सवाल उद्धव ठाकरे गटाने सामना मधून विचारला आहे. महाराष्ट्रात सरकार नावाची चीज शिल्लक राहिली आहे काय, असा प्रश्न उपस्थित व्हावा, अशी मृत्युकांडे महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत. औषधांच्या तुटवड्यामुळे राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या मृत्यूचे सत्रच सुरू आहे. महिनाभरापूर्वी ठाण्यात आणि आता नांदेड व छत्रपती संभाजीनगरात जे भयंकर रुग्णकांड झाले, ते अत्यंत वेदनादायक व संतापजनक आहे. देशातील सर्वात प्रगत राज्य, असे बिरुद अभिमानाने मिरवणाऱ्या महाराष्ट्राची मान आज शरमेने खाली झुकली आहे. महाराष्ट्रात निपजलेल्या सत्तापिपासू मिंध्यांच्या गलथानपणामुळे किडे-मुंग्या मराव्यात त्या पद्धतीने सरकारी रुग्णालयांत मृत्यूचे तांडव सुरू आहे. महिनाभरापूर्वी ठाण्यातील कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एका रात्रीत 18 रुग्णांचा अचानक मृत्यू झाला. त्या घटनेची चौकशी होत नाही, तोच मागील दोन दिवसांत मराठवाड्यात 53 रुग्णांचा शासकीय रुग्णालयांमध्ये बळी गेला. होय, हे बळीच आहेत! याला नैसर्गिक मृत्यू म्हणताच येणार नाही. नांदेडच्या शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाच्या शासकीय रुग्णालयात तर दोन दिवसांत 35 रुग्णांचा तडफडून मृत्यू झाला. या 35 पैकी 16 बळी तर नवजात अर्भकांचे आहेत. सोमवारी 24 जणांचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या दुसऱ्याच दिवशी नांदेड रुग्णालयात आणखी 11 जणांचा व छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयातही मंगळवारी 18 जणांचा बळी गेला.

# मोदी देशातील सर्वात भ्रष्ट पंतप्रधान!

## संजय सिंह यांच्या अटकेनंतर केजरीवालांचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंह यांना अटक केली आहे. ईडीने आज सकाळी सातच्या सुमारास संजय सिंह यांच्या निवासस्थानी छापा टाकला होता. सलग दहा तास चौकशी केल्यानंतर ईडीने संजय सिंह यांना अटक केली आहे.**

या अटकेनंतर दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केरीवाल यांनी बुधवारी संजय सिंह यांच्या निवासस्थानी भेट दिली. अरविंद केजरीवाल यांनी राज्यसभा खासदार संजय सिंह यांचे वडील, त्यांची पत्नी आणि इतर कुटुंबातील सदस्यांची भेट घेतली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना अरविंद केजरीवाल यांनी मोदी सरकारवर सडकून टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वात भ्रष्ट व्यक्ती आहे, अशी टीका अरविंद केजरीवाल यांनी केली. यावेळी अरविंद केजरीवाल म्हणाले, “आम आदमी पार्टी ही एक कट्टर प्रामाणिक पार्टी आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे. प्रामाणिकपणाचा रस्ता खूप कठीण असतो. आज आम्ही या लोकांसारखं (भाजपा) बेईमान झालो तर आमच्या सर्व समस्या संपतील. आम्ही कट्टर ईमानदार आहोत.

यामुळेच आम्हाला विविध समस्यांना सामोरं जावं लागत आहे. हेच यांचं मोठं दुःख आहे. हे डोक्यापासून पायापर्यंत भ्रष्टाचारी आहेत. त्यांना आमच्या ईमानदारीचा विरोध करता येत नाहीये.” “दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीने आतापर्यंत एक हजाराहून अधिक छापे मारले. अनेक लोकांना अटक केलं. हा १०० कोटींचा घोटाळा असल्याचा दावा त्यांच्याकडून केला जातो, मात्र एवढी छापेमारी करूनही त्यांना एक पैसाही सापडला नाही. ना जमिनीचे दस्तावेज सापडले, ना सोन्या-चांदीचे दागिने मिळाले. मागील एक वर्षात यांना काहीच मिळालं नाही. तरीही ते जबरदस्तीने लोकांना अटक करत आहेत”, अशी टीका अरविंद केजरीवाल यांनी केली. केजरीवाल पुढे म्हणाले, “आज यांनी संजय सिंह यांना अटक केली आहे. संजय सिंह हे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भ्रष्टाचाराविरोधचा सर्वात बुलंद आवाज आहेत. नरेंद्र मोदी डोक्यापासून पायापर्यंत भ्रष्टाचारात बुडाले आहेत. स्वातंत्र भारताचे सर्वात भ्रष्टाचारी पंतप्रधान कुणी असेल तर ते नरेंद्र मोदी आहेत. उद्या यांचं सरकार गेलं आणि त्यांच्या कारभाराची चौकशी झाली, तर लक्षात येईल यांनी किती भ्रष्टाचार केला आहे. या भ्रष्टाचाराविरोधात संसदेत आणि संसदेबाहेर सर्वात बुलंद आवाज संजय सिंह होते. हे मोदींना बघवलं नाही. त्यामुळे त्यांनी आधी संजय सिंह यांना संसदेतून निलंबित केलं आणि आज खोट्या प्रकरणात अटक केली.

### जबरदस्तीने लोकांना अटक करत आहेत

» “दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीने आतापर्यंत एक हजाराहून अधिक छापे मारले. अनेक लोकांना अटक केलं. हा १०० कोटींचा घोटाळा असल्याचा दावा त्यांच्याकडून केला जातो, मात्र एवढी छापेमारी करूनही त्यांना एक पैसाही सापडला नाही. ना जमिनीचे दस्तावेज सापडले, ना सोन्या-चांदीचे दागिने मिळाले. मागील एक वर्षात यांना काहीच मिळालं नाही. तरीही ते जबरदस्तीने लोकांना अटक करत आहेत”, अशी टीका अरविंद केजरीवाल यांनी केली.

# सिलिंडरची किंमत 100 रुपयांनी घटली!

## उज्ज्वला योजनेंतर्गत अवघ्या 600 रुपयांत सिलिंडर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मोदी सरकारनं उज्ज्वला योजनेंतर्गत कोट्यवधी लाभार्थ्यांना मोठं गिफ्ट दिलं आहे. केंद्रातील मोदी सरकारने गॅस सिलिंडरच्या सबसिडीमध्ये २०० रुपयांऐवजी ३०० रुपये एवढी वाढ केली आहे. म्हणजेच उज्ज्वला योजनेंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना ६०० रुपयांत घरगुती गॅस सिलिंडर मिळणार आहे. ३७ दिवसांत मोदी सरकारने दुसऱ्यांदा दर कमी केले आहेत. ज्याचा फायदा १० कोटी लाभार्थ्यांना दिला जाणार आहे. तत्पूर्वी २९ ऑगस्टला सरकारने २०० रुपये गॅस सिलिंडरचे दर कमी केले होते. ज्याचा फायदा देशातील सर्वच ग्राहकांना झाला होता.**



### सिलिंडरच्या किमती 200 रुपयांनी कमी

» महिनाभरापूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळाने एलपीजी सिलिंडरच्या किमती २०० रुपयांनी कमी करण्याचा निर्णय घेत नागरिकांना दिलासा दिला होता. उदाहरणार्थ, दिल्लीतील या निर्णयामुळे १४.२ किलो सिलिंडरची किंमत सध्याच्या १,१०३ रुपये प्रति सिलिंडरवरून ९०३ रुपये झाली आहे. उज्ज्वला कुटुंबांना प्रति सिलिंडर २०० रुपयांच्या विद्यमान अनुदानाव्यतिरिक्त हे होते, जे सुरू राहणार आहे.

मोदी सरकारने पंतप्रधान उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अनुदानाची रक्कम २०० रुपयांवरून ३०० रुपये प्रति एलपीजी सिलिंडरपर्यंत वाढवली आहे, असंही मंत्रिमंडळाच्या निर्णयांबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले आहे. यापूर्वी २९ ऑगस्ट रोजी केंद्र सरकारने गॅस सिलिंडरच्या दरात २०० रुपयांची वाढ केली होती. ज्या अंतर्गत देशातील सर्व गॅस सिलिंडर ग्राहकांना दिलासा देण्यात आला आहे. त्यानंतर उज्ज्वला योजनेंतर्गत २०० रुपयांच्या सबसिडीसह ४०० रुपयांची सूट आणि २०० रुपयांची कपात करण्यात आली. आता सरकारने अनुदान २०० रुपयांवरून ३०० रुपये केले आहे. त्यानंतर ७०० रुपयांना मिळणारा गॅस सिलिंडर ६०० रुपयांना उपलब्ध झाला आहे. महिनाभरापूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळाने एलपीजी सिलिंडरच्या किमती २०० रुपयांनी कमी करण्याचा निर्णय घेत नागरिकांना दिलासा दिला होता. उदाहरणार्थ, दिल्लीतील या निर्णयामुळे १४.२ किलो सिलिंडरची किंमत सध्याच्या १,१०३ रुपये प्रति सिलिंडरवरून ९०३ रुपये झाली आहे. उज्ज्वला कुटुंबांना प्रति सिलिंडर २०० रुपयांच्या विद्यमान अनुदानाव्यतिरिक्त हे होते, जे सुरू राहणार आहे. या कपातीनंतर दिल्लीतील उज्ज्वला लाभार्थ्यांची प्रभावी किंमत प्रति सिलिंडर ७०३ रुपये झाली आहे. देशात ३१ कोटींहून अधिक घरगुती LPG ग्राहक आहेत, ज्यात ९.६ कोटी उज्ज्वला लाभार्थी आहेत. सप्टेंबरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने उज्ज्वला योजनेंतर्गत महिलांना अतिरिक्त ७५ लाख एलपीजी कनेक्शन देण्यास मान्यता दिली होती केंद्रीय मंत्री ठाकूर यांनी सांगितले.

# लालू-राबडी आणि तेजस्वींना जामीन मंजूर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

लँड फॉर जॉब्स प्रकरणात लालू कुटुंबीयांना दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात लालू, तेजस्वी, राबडी देवी यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. प्रत्येकी 50,000 रुपयांच्या जातमुचलक्यावर नियमित जामीन मंजूर करण्यात आला आहे. आता याप्रकरणी 16 ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी आजपासून सुरू होणार आहे.

सर्व आरोपी वरिष्ठ पदांवर कार्यरत असल्याचे सांगत सीबीआयने जामिनाला विरोध केला होता. हे प्रकरण प्रभावित करू शकतात. आम्हाला असे काही वाटत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. लालू, राबडी आणि तेजस्वी यांच्यासोबत मीसा भारतीही कोर्टात पोहोचल्या. इकडे दिल्लीत पोहोचल्यावर लालू यादव म्हणाले होते की, सुनावणी होत राहते... आपण घाबरायला हवे असे काही केले नाही. तेजस्वी यादव यांचे वक्तव्यही समोर आले आहे, ते म्हणाले की, मोदीजींच्या राजवटीत सत्य बोलणाऱ्यांवर कारवाई केली जाते... ते एजन्सी आणि पोलिसांचा गैरवापर करत आहेत. 22 सप्टेंबर रोजी सीबीआयच्या विशेष न्यायालयाने लालू यादव, राबडी देवी, तेजस्वी यादव यांच्यासह 17 आरोपींविरुद्ध समन्स जारी केले होते. सर्वांना 4 ऑक्टोबरला न्यायालयात हजर राहण्यास सांगण्यात आले. लँड फॉर जॉब्स प्रकरणात तेजस्वी यादव यांच्यावर दाखल करण्यात आलेले आरोपपत्री न्यायालयाने स्वीकारले आहे. त्याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. सीबीआयने पहिल्यांदाच बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांना आरोपी बनवले आहे. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव म्हणाले की, ही पहिली आणि शेवटची घटना नाही. हे सर्व चालूच राहील. आम्हाला काही फरक पडत नाही. या सर्व बाबींमध्ये काही अर्थ नाही.

# अभिनेता रणबीर कपूरला ईडीचे समन्स!

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरला ईडीने समन्स बजावला आहे. तपास यंत्रणेने अभिनेत्याला 6 ऑक्टोबरला चौकशीसाठी बोलावले आहे. प्रकरण ऑनलाइन गेमिंगशी संबंधित आहे. ऑनलाइन गेमिंग ॲप प्रकरणातील आरोपी सौरभ चंद्राकरच्या लग्नाला रणवीर महादेव सहभागी झाला होता. सौरभवर हवालाद्वारे कलाकारांना पैसे दिल्याचा आरोप आहे . रणबीर कपूर या ॲपचे प्रमोशन करत होता. त्याला मोठी रक्कम रोख स्वरूपात मिळाल्याचा ईडीचा दावा आहे. ईडी ऑनलाइन गेमच्या जाहिरातींद्वारे निधीची देखील चौकशी करेल. रणबीर कपूर ईडीसमोर हजर राहतो की त्याच्या वकिलामार्फत समन्सला उत्तर देणार हे पाहणे बाकी आहे. या प्रकरणी ईडी टायगर श्रॉफ, नुसरत भरूचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओन यांच्यासह 17 सेलिब्रिटींची चौकशी करू शकते अशी बातमी यापूर्वी आली होती. आता या यादीत रणबीरच्या नावाचाही समावेश झाला आहे. आजकाल, ईडी 5,000 कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात दुबईतून ऑनलाइन बेटिंग ॲप चालवणारे सौरभ चंद्राकर आणि त्याचा व्यवसाय भागीदार रवी उप्पल यांची चौकशी करत आहे. एका रिपोर्टनुसार, हे अभिनेते आणि गायक या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव बुक ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्या लग्नाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या सर्व सेलिब्रिटींनी लग्नात परफॉर्मन्सही केला. या प्रकरणात टायगर श्रॉफ, सनी लिओन, नुसरत भरुचा, नेहा कक्कर, आतिफ अस्लम, राहत फतेह अली खान, अली असगर, विशाल ददलानी, एली अबराम, भारती सिंग, भाग्यश्री, क्रिती खरबंदा, कृष्णा अभिषेक आणि सुखविंदर सिंग यांच्यासह अनेक सेलिब्रिटी आहेत त्यांची देखील चौकशी होण्याची शक्यता आहे.



## दिव्या भारतीने नाकारला होता आँखे!

चित्रपट निर्माते आणि CBFC (सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन) चे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांनी 90 च्या दशकातील नायिका दिव्या भारतीबद्दल आठवण सांगितली आहे. त्यांनी एका मुलाखतीत सांगितले की, 1993 मध्ये जेव्हा त्यांना दिव्याला 'आँखे' चित्रपटात कास्ट करायचे होते, तेव्हा अभिनेत्री त्यांच्यावर रागावली होती.

बॉलीवूड ठिकानाला दिलेल्या मुलाखतीत पहलाज निहलानी म्हणाले की, मला दिव्या भारती, पूजा भट्ट आणि जुही चावला यांना आंखे चित्रपटात कास्ट करायचे होते. मी चंकी पांडेच्या विरुद्ध दिव्याला कास्ट करण्याचा विचार करत होतो, तर गोविंदाच्या विरुद्ध रितू शिवपुरीला साईन करण्यात आले होते. डेव्हिड धवनने जेव्हा दिव्याला हे सांगितले तेव्हा तिला धक्काच बसला. मी तिला भेटायला गेलो तेव्हा दिव्या मला म्हणाली, मी ऐकले की तुम्ही मला चंकीच्या विरुद्ध कास्ट करण्याचा विचार करत आहात? मी हो म्हणालो आणि तिने लगेचच चित्रपटात काम करण्यास नकार दिला. तिला चंकी पांडेची हिरोईन बनायचे नव्हते. पहलाज निहलानी यांनी असेही सांगितले की, जेव्हा त्यांनी दिव्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्यांनी तिला वजन कमी करण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर तिला शोला और शबनम या चित्रपटात कास्ट करण्यात आले, ज्यामध्ये गोविंदा नायक होता आणि डेव्हिड धवन दिग्दर्शक होते. दिव्याने तिच्या सेक्रेटरीमार्फत माझ्याशी संपर्क साधला होता.

## सायकलने शाळेत जायची परिणिती

परिणिती चोप्रा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. यादरम्यान, तिच्याशी संबंधित एक व्हिडिओ चर्चेत आहे, त्यात तिने सांगितले की, जेव्हा ती लहान होती तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबुक पोस्टचे स्क्रीनशॉट देखील आहेत, त्यात तिने परिणितीच्या म्हणण्याला पूर्णपणे नकार दिला आहे. परिणितीने सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या असल्याचे ती म्हणाली. आजच्या प्रमाणे त्या काळातही परिणितीची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मजबूत होती, असे तिने म्हटले आहे. व्हिडीओ समोर येताच यूजर्स त्याला जोरदार ट्रोल करत आहेत. लोक म्हणतात की परिणीतीने सहानुभूतीसाठी खोट्या गोष्टी सांगितल्या. कियारा-सिद्धार्थसारखे जयमालाचे फंक्शन केल्यामुळे लोक तिला प्रचंड ट्रोल करत आहेत. हा व्हिडिओ 2017 च्या मार्शल आर्ट इव्हेंटमधील आहे. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत परिणिती म्हणाली होती की, वाढत्या वयाबरोबर मी आणि माझे भाऊ दोघांनीही अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यावेळी आमच्याकडे जास्त पैसे नव्हते. यासाठी मी सायकलने शाळेत जायचे. बस किंवा कारने जाणेही शक्य नव्हते. त्यावेळी आमच्याकडे गाडीही नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबूक पोस्टचे स्क्रीनशॉटही आहेत. त्या मुलीने स्वतःला परिणीतीची मैत्रीण असल्याचे सांगितले आहे. अशा खोट्या गोष्टी सांगताना लाज वाटली पाहिजे, असे त्यांनी लिहिले आहे. उच्च समाजातून आलेली असूनही ती कॅमेऱ्यासमोर पडून होती. मला वाटते की प्रत्येक सेलिब्रिटी असेच करतो. सहानुभूतीसाठी तो म्हणाला की त्याच्याकडे गाडी नाही आणि पैसे नाहीत. आम्ही दोघे एकाच शाळेत शिकलो. मला आठवते तिच्या वडिलांकडे गाडी होती. त्याकाळी सायकल चालवण्याचा ट्रेंड असल्यामुळे ती कारऐवजी सायकलने शाळेत यायची. त्यावेळी अनेकांकडे सायकलीही नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे. परिणितीचा हा व्हिडिओ REDDIT साइटवर उपलब्ध आहे. या व्हिडिओवर कमेंट करताना एका चाहत्याने लिहिले होते की, परिणिती नेहमीच थ्रो करत असते. त्यांच्याबद्दल काहीही योग्य नाही. मी भेदभाव करत आहे, असे वाटू शकते परंतू ते खरे आहे की त्यांनी कियारा आणि सिडच्या लग्नाची एन्ट्री देखील कॉपी केली आहे. 17 व्या वर्षी शिक्षणासाठी यूकेला गेल्यावर ती गरीब कशी असेल? दुसऱ्या यूझरने उपरोधिकपणे लिहिले की, बिचारी परिणीती सायकलवरून शाळेत गेल्यानंतर शॉकमध्ये आहे.



## एकेकाळी वहिदा यांनी मारली होती थापड!

कौन बनेगा करोडपती शोच्या 15 व्या सीझनमध्ये अमिताभ बच्चन यांनी ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रहमानचे कौतुक केले आहे. बिग बींनी तिची तुलना अशा स्टार्सशी केली जे लूक आणि मेक-अप तपासण्यासाठी फक्त आरसा धरण्यासाठी 4 लोक ठेवायचे. पण वहिदा केवळ एका कॉम्पॅक्टने सर्व करत होत्या. कौन बनेगा करोडपती 15 च्या नुकत्याच प्रसारित झालेल्या एपिसोडमध्ये दिल्ली मेट्रोच्या वरिष्ठ स्टेशन मॅनेजर रिचा सिंग हॉटसीटवर होत्या. गेम सुरू करण्यापूर्वी रिचा सिंग यांचा एक व्हिडिओ प्रेक्षकांना दाखवण्यात आला, त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रहमानचा किस्सा सांगितला. ते पुढे म्हणाले, त्यावेळी असे अनेक कलाकार होते ज्यांनी फक्त आरसा पकडण्यासाठी चार जणांना सोबत ठेवलेले असायचे, कारण शॉट सुरू होण्यापूर्वी त्यांना मेकअप, आउटफिट सर्वकाही पहावे लागत होते. सर्व काही परिपूर्ण आहे की नाही हे ते पाहत असे. त्या ॲक्टर्सची नावे घेतल्यास ते त्यांनाच पकडतील, असे म्हणत त्यांची नावे घेण्यास नकार दिला. रेश्मा और शेरा या चित्रपटात अमिताभ बच्चन, वहिदा रहमान आणि सुनील दत्त मुख्य भूमिकेत होते. शूटिंगदरम्यान वहिदा यांना एका सीनसाठी अमिताभ बच्चन यांना खोटी थापड मारावी लागली. शूटिंग सुरू होण्याआधी वहिदाजींनी त्यांना इशारा केला आणि म्हणाल्या.

## लहान भाऊ अबरामसोबत दिसली सुहाना खान

शाहरुख खानची मुलगी सुहाना खान लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. अलिकडेच सुहाना तिचा लहान भाऊ अबरामसोबत मुंबईतील एका कॅफेबाहेर दिसली. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये दोघे भाऊ-बहीण एकमेकांचा हात धरून कॅफेच्या बाहेर जाताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये सुहाना खूपच कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. तिने ग्रीन प्रिंटेड बॉडीकॉन ड्रेस परिधान केला आहे. त्यादरम्यान ती नो मेकअप लूकमध्ये दिसली. तिने पोनीटेल आणि हँडबॅगने हा लूक पूर्ण केला. त्याचवेळी अबराम निळ्या आणि पांढऱ्या टी-शर्टसह निळ्या शॉर्ट्समध्ये दिसत आहे. सुहानाचा हात धरून चालताना तो खूप क्यूट दिसत होता. सुहानाचा हा व्हिडिओ चाहत्यांना खूप आवडला आहे. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले - सुहाना खरोखरच सुंदर आणि सुंदर दिसत आहे. आणखी एकाने लिहिले- अबरामने आपल्या बहिणीचा हात ज्या प्रकारे पकडला आहे, तो खूपच क्यूट दिसत आहे. सुहाना खान लवकरच झोया अख्तरच्या 'द आर्चिज' या चित्रपटातून तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात करणार आहे. या चित्रपटाद्वारे झोया तीन स्टार किड्स लॉंच करत आहे. शाहरुख खान- गौरीची मुलगी सुहाना खान, बोनी कपूर-श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूर आणि अमिताभ बच्चन-जया बच्चन यांची नात अगस्त्य नंदाही या चित्रपटात दिसणार आहे. याशिवाय युवराज मेंडा, मिहिर आहुजा, अदिती डॉट आणि वेदांग रैना देखील या चित्रपटात दिसणार आहेत. हा चित्रपट यावर्षी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.



# एशियाडमध्ये भारताला तीन सुवर्ण!

## » नीरज चोप्राने 'गोल्ड' तर किशोरने रौप्यपदक जिंकले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**बुधवारी भारताने तिसरे गोल्डमेडल जिंकले. जागतिक आणि ऑलिम्पिक चॅम्पियन नीरज चोप्रानंतर भारतीय संघाने पुरुषांच्या 4X400 मीटर रिले शर्यतीत प्रथमस्थान पटकावले. तत्पूर्वी तिरंदाजी मिश्र संघाने दिवसातील पहिले सुवर्ण जिंकले. आज भारताने 3 सुवर्ण, 4 रौप्य आणि 4 कांस्य अशी एकूण 10 पदके जिंकली आहेत. प्रथम नीरज चोप्राने भालाफेक स्पर्धेत या हंगामातील सर्वोत्कृष्ट 88.88 मीटर गुणांसह प्रथम स्थान मिळविले. या स्पर्धेत किशोर कुमार जेना 87.54 मीटर गुणांसह दुसरा राहिला. नीरज आणि किशोर यांनी चौथ्या प्रयत्नात सर्वोत्तम गोल केले. भालाफेक स्पर्धेनंतर लगेचच, भारतीय संघाने पुरुषांच्या 4X400 मीटर रिले शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावला. या पदकांच्या मदतीने भारताची एकूण पदकसंख्या 81 वर पोहोचली आहे. यामध्ये 18 सुवर्ण, 31 रौप्य आणि 32 कांस्यपदकांचा समावेश आहे.**



35 किमी रेस ट्रॅकमध्ये कांस्य मिळाले 35 किमी शर्यतीच्या चालण्याच्या मिश्र सांघिक स्पर्धेत भारताला कांस्यपदक मिळाले. भारतीय संघात राम बाबू आणि मंजू राणी यांनी मिळून ही शर्यत 5 तास 51 मिनिटे 14 सेकंदात पूर्ण केली. यामध्ये राम बाबूने 2 तास 42 मिनिटे 11 सेकंदात आणि मंजू राणीने 3 तास 09 मिनिटे 3 सेकंदात शर्यत पूर्ण केली. चीनने ही शर्यत 5 तास 16 मिनिटे 41 सेकंदात पूर्ण करून सुवर्णपदक जिंकले. धनुर्विद्या : दिवसाचे पहिले सोने आले तिरंदाजी मिश्र सांघिक कंपाऊंड स्पर्धेत भारताने सुवर्णपदक पटकावले. सुवर्णपदकाच्या लढतीत ओजस प्रवीण आणि ज्योती सुरेखा या भारतीय जोडीने कोरियन जोडीचा 159-158 असा पराभव केला. तर चायनीज तैपेईने कांस्यपदक जिंकले. 1951 मध्ये झालेल्या पहिल्या आशियाई खेळापासून भारत या खेळांचा भाग आहे. त्यानंतर नवी दिल्लीनेच यजमानपद भूषवले. भारताने सर्व 18 आशियाई खेळांमध्ये भाग घेतला. 2018 मध्ये झालेल्या गेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने 70 पदके जिंकली होती. यामध्ये 16 सुवर्ण, 23 रौप्य आणि 31 कांस्यपदकांचा समावेश आहे. देश पदकतालिकेत 8 व्या क्रमांकावर होता, परंतु भारताने यापूर्वी कधीही इतकी पदके जिंकली नव्हती. बुधवारी म्हणजेच आज चीनमधील हांगझोऊ येथे 115 भारतीय खेळाडू 14 खेळांमध्ये आपली ताकद दाखवतील ज्यात तिरंदाजी, ऍथलेटिक्स, बॉक्सिंग, हॉकी आणि कुस्तीचा समावेश आहे. आजपासून कुस्ती स्पर्धा सुरू होत आहेत, त्यामुळे भारताला आज तीन सुवर्णांसह डझनभर पदके मिळू शकतात. 11व्या दिवशी भारताला तिरंदाजीत 2, अॅथलेटिक्समधून अर्धा डझनहून अधिक, बॉक्सिंगमधून 2 आणि कुस्तीमधून 2 पदके मिळू शकतात. भारताची स्टार खेळाडू पीव्ही सिंधूने उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. सिंधूने 16 च्या फेरीत इंडोनेशियाच्या वरदानी पुत्री कुसुमाचा 2-0 असा पराभव केला.

भारताच्या तनिषा क्रास्टो आणि साई प्रतीक कृष्णा प्रसाद यांना मिश्र दुहेरीच्या 16व्या फेरीच्या सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. भारतीय जोडीचा मलेशियाच्या तोह ई वेई आणि चेन तांग जी यांनी 21-18-, 21-18 अशा सरळ गेममध्ये पराभव केला. त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीला महिला दुहेरीच्या 16व्या फेरीत कोरियाच्या किम सोयुंग आणि कोंग हेयुंग या जोडीकडून 2-1 (15-21, 21-18, 13-21) पराभव पत्करावा लागला. कबड्डी: भारतीय पुरुष संघाने थायलंडचा 63-26 असा पराभव केला. कुस्ती: सुनील कुमारला पुरुषांच्या 87 KG ग्रीको-रोमन उपांत्य फेरीत इराणच्या नासेर अलीजादेहकडून 1-5 असा पराभव पत्करावा लागला.

### आज पदकाची आशा...

» अॅथलेटिक्स: 8 स्पर्धांचे अंतिम सामने होतील, अर्धा डझनहून अधिक पदके जिंकता येतील. भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि अविनाश साबळे यांच्यासह भारतीय खेळाडू आज 8 अॅथलेटिक्स स्पर्धांच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत. दोघांकडून सोने अपेक्षित आहे.
बॉक्सिंग: लव्हलिना सुवर्णासाठी लढणार भारताची ऑलिम्पिक पदक विजेती लोव्हलिना महिलांच्या 75 किलोग्रॅम वजनी गटात सुवर्णपदकाची लढत खेळेल, तर प्रवीण पुरुषांच्या 57 किलोग्रॅम वजनी गटातील उपांत्य फेरीत खेळेल.

# वर्ल्ड कपचा उद्घाटन सोहळा नाही होणार!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

एकदिवसीय विश्वचषक 2023 मध्ये कोणताही उद्घाटन सोहळा होणार नाही. बीसीसीआयच्या सूत्रांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, यावेळी वर्ल्ड कपचा उद्घाटन सोहळा होणार नाही. कॅप्टन डे समारंभ किंवा परेड 4 ऑक्टोबर रोजी होणार आहे. हे पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार होईल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये हा सोहळा होणार आहे. वृत्तानुसार, स्पर्धेचा समारोप समारंभ आवश्यक असेल. याशिवाय भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यापूर्वी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजनही केले जाणार आहे. त्याची संपूर्ण माहिती समोर आलेली नाही. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्घाटन समारंभाचा कोणताही प्लॅन नव्हता. अशा स्थितीत ती रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वर्ल्ड कप 2023 चा अधिकृत उद्घाटन सोहळा 4 ऑक्टोबर रोजी होणार होता. पहिला सामना दुसऱ्या दिवशी म्हणजेच ५ ऑक्टोबरला होणार आहे. चाहतेही या उद्घाटन सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत होते.


रिपोर्ट्सनुसार, बॉलीवूड स्टार रणवीर सिंग, गायक अरिजित सिंग, अभिनेत्री तमन्ना भाटिया, गायिका श्रेया घोषाल आणि दिग्गज गायिका आशा भोसले उद्घाटन समारंभात परफॉर्म करणार होते. याशिवाय फटाक्यांची आतषबाजी आणि लेझर शोही होणार होता.

# पावसात धुतले गेले 4 सराव सामने!

## » स्पर्धेलाही बसणार का पावसाचा फटका?

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय विश्वचषक उद्यापासून म्हणजे 5 ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे, पट 10 पैकी 7 सराव सामन्यांवर पावसाचा परिणाम झाला. 4 सामने रद्द झाले, तर 3 मध्ये षटके कमी केल्यावरच निकाल शक्य झाला. 50-50 षटकांचा संपूर्ण खेळ केवळ 3 सामन्यांतच शक्य झाला. भारताचे दोन्ही सराव सामने पाण्याने धुतले गेले. अशा स्थितीत आशिया चषकाप्रमाणे विश्वचषकाची मजाही पावसामुळे विस्कळीत होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



10 शहरांच्या हवामान विभागांशी संपर्क साधला आणि जिथे विश्वचषक सामने होणार आहेत स्पर्धेदरम्यान तिथे हवामानाची स्थिती कशी असेल याची माहिती घेतली.

हवामान खात्याने सांगितले की, 'मान्सून 15 ऑक्टोबरपर्यंत भारतातून बाहेर पडेल आणि बहुतांश सामन्यांवर पावसाचा मोठा धोका नाही. या कालावधीत भारताच्या ईशान्य आणि समुद्राजवळ असलेल्या दक्षिण भारतीय भागात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता कमी आहे. सध्या पॅसिफिक महासागरावर 'अल निनो' वादळाची स्थिती आहे. हवामानावर त्याचा फारसा परिणाम होणार नसून पाऊस असला तरी तो कमी होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर वर्ल्ड कपचे 5 सामने होणार आहेत.

यामध्ये इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील सलामीचा सामना, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मोठा सामना आणि स्पर्धेचा अंतिम सामना यांचा समावेश आहे. अहमदाबाद हवामान विभागाचे शास्त्रज्ञ मनोरमा मोहंती म्हणाले, '5 ऑक्टोबरला पहिल्या सामन्याच्या दिवशी पावसाची शक्यता नाही. मात्र, या दिवशी शहराच्या काही भागात हलके ढग असतील. तापमान 24 ते 35 अंश सेल्सिअस दरम्यान राहील.